**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

## गौतम बुद्धांबद्दल लहान मुलांमध्ये रुची निर्माण करण्याचे चित्रकला उत्तम साधन - कुलगुरु
## विद्यापीठातील बुद्धीस्ट स्टडीज सेंटरतर्फे चित्रकला व रंग भरणे स्पर्धेचे आयोजन

अमरावती.

भगवान गौतम बुद्ध यांनी जगाला अहिंसा व सत्याचा उपदेश दिला असून प्रेम व शांतीची शिकवण दिली. एवढेच नव्हे; तर वैज्ञानिक दृष्टी देवून मानवजातीच्या कल्याणाविषयी गोष्टी सांगितल्यात. गौतम बुद्धांबद्दल लहान मुलांमध्ये रुची निर्माण व्हावी, त्यांचे विचार लहान मुलांमध्ये रुजावेत, यासाठी विद्यापीठातील बुद्धीस्ट स्टडीज सेंटरच्यावतीने चित्रकला व रंग भरणे स्पर्धा उत्तम साधन असल्याचे सांगून या स्पर्धेमध्ये मुलांनी दिलेल्या उत्स्फूर्त सहभागाबद्दल कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर यांनी कौतुक केले. यावेळी व्यासपीठावर कुलसचिव डॉ. अजय देशमुख व भौतिकशास्त्र विभागप्रमुख डॉ.एस.के. ओमनवार यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

बक्षिस वितरण समारंभ प्र-कुलगुरु डॉ. राजेश जयपूरकर यांचे हस्ते संपन्न झाला. यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ.जे.डी. वडते, भौतिकशास्त्र विभागप्रमुख डॉ.एस.के. ओमनवार उपस्थित होते. चित्रकला स्पर्धेमध्ये प्रथम पारितोषिक कु. अनुष्का वानखडे हिला, द्वितीय पारितोषिक कु. अशलेषा कठाणे हिला व तृतीय पारितोषिक कु. अहाना गादे हिला प्राप्त झाले. रंग भरणे स्पर्धेमध्ये प्रथम पारितोषिक भावार्थ साहारकर याला, द्वितीय पारितोषिक अर्णव वानखडे याला व तृतीय पारितोषिक आदित्य लोहपंचाग याला प्राप्त झाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक बुद्धीस्ट स्टडीज सेंटरचे समन्वयक डॉ. गजानन मुळे यांनी केले. संचालन प्रा. वैशाली धनविजय यांनी तर आभार सह-समन्वयक प्रा. विनोद नागले यांनी मानले. कार्यक्रमाला डॉ. अनिता पाटील, डॉ.एन.बी. सेलूकर, डॉ. अनिल नाईक, डॉ. कपिल कांबळे, डॉ. अविनाश मनवर, डॉ. अनिकेत गादे, डॉ. तुषार वानखडे, डॉ. नितीन बनसोड, पंडित वानखडे, विनोद वराडे, राजेंद्र पाचकवडे, नितीन लव्हाळे, ग.बा. काळे, विशाल बनसोड, सतीश आठवले, शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. ३०/०४/२०१८.

दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी